ISSN 2249-894X Impact Factor : 3.8014 (UIF) Volume - 6 | Issue - 2 | November - 2016

Review Of Research

# "भारतीय शेती क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांसाठी केलेल्या सरकारी उपाययोजनांचा आढावा."

**प्रा.डॉ.डी.जी.पाटील**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख , जी.टी.पाटील महाविद्यालय, नंदुरबार.**

## प्रस्तावना :- (Introduction)

जगातील एकूण शेतकऱ्यांपैकी 24 % शेतकरी भारतात आहेत. भारताची अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेवर
अवलंबून असल्यामुळे सर्वप्रथम अर्थव्यवस्था मजबूत करणे हे राष्ट्राचे प्रथम कर्तव्य मानले जाते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया कृषीवर
आधारित असून मानवाच्या मूलभूत गरजा अन्न , वस्त्र , निवारा , आरोग्य, शिक्षण व पाणी या प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहेत.
भारतीय कृषी क्षेत्रास अर्थव्यवस्थेचा कणा किंवा उद्योगक्षेत्राची जननी आणि मानवी जीवनाचा पोषणकर्ता म्हणून ओळखले जाते. कारण रोजगार , अन्नधान्य उत्पादन, आर्थिक विकास , औद्योगिक विकास, निर्यात , व्यापार , राष्ट्रीय उत्पन्न व आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी क्षेत्रात कृषीबाबतचे योगदान महत्त्वपूर्ण आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेती व्यवसाय अतिशय महत्त्वाचा घटक आहे असे असले तरी कृषी क्षेत्रास काळानुरूप अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. वाढणारी लोकसंख्या आणि पिकाऊ जमिनीचा औद्योगिक व शहरीकरणासाठी वाढता वापर हे अन्नसुरक्षेसाठी मोठे अडथळे आहे.
आजच्या काळातसुद्धा शेती हा भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. जवळपास 64 % लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून 17 % वाटा कृषी क्षेत्राचा आहे. भारतातील लोकसंख्येला मोठ्या प्रमाणात रोजगार पुरविणारे क्षेत्र असून सुद्धा राष्ट्रीय उत्पन्न आणि निर्यातीतील वाटा व विकासात कोणकोणते अडथळे आहेत हे पाहणे आवश्यक ठरते ? भारतीय शेतीकरी आत्महत्या का करीत आहे ? नवीन आर्थिक धोरणाचा कृषी क्षेत्रावरील काय परिणाम झाला. जागतिकरणामुळे कृषी क्षेत्रापुढील कोणती संकटे उभी राहतात? हे संकट दूर करण्यासाठी सरकारच्या कोणकोणत्या योजना आहेत ? याचा अभ्यास करणे हितावाह ठरते.

## शोध निबंधाची उद्दिष्ट्ये (Objectives) :-

1) भारतातील कृषी संकटाचा आढावा घेणे.
2) कृषी संकटाच्या प्रमुख कारणाचा शोध घेणे.
3) जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
4) कृषी संकट निमूर्लनासाठी सरकारच्या योजना अभ्यासणे.
5) भारतातील कृषी संकट दूर करण्यासाठी संभाव्य उपाय सुचविणे.

## अभ्यासपद्धती :-

प्रस्तुत अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ , मासिके , विविध शासकीय अहवाल ,तसेच प्रामुख्याने दुय्यम सामग्रीचा आधार घेतला आहे.

## कृषी क्षेत्रापुढील संकटे :-

भारताने आज स्वातंत्र्याचा 66 वर्षाचा टप्पा गाठला आहे. या 66 वर्षात भारताने आर्थिक विकासाच्या दृष्टीने **गरूडझेप** घेतली आहे. परंतु शेतीपुढे नवनवीन संकटे उभे राहत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाची दिशा ठरविणे सोयीचे होईल. भारतीय कृषी क्षेत्रापुढील संकटे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### 1) जागतिकीकरण आणि भारतातील कृषी संकट :-

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कारण आजही 64% लोकसंख्या शेती व शेतीशी संबंधित आहे. भारताने WTO चे सदस्यत्व स्वीकारल्याने भारतात कृषी क्षेत्रावरील जी बंधने होती ती दूर करण्यात आली. त्यामुळे विदेशी उत्पादकांना भारताची दरवाजे पुर्णपणे खुली झाली. टीकाकाराचे असे मत आहे की, कृषी क्षेत्रात उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्याने किंवा सबसिडी समाप्त करणे, कृषी बी- बियाणासाठी पेटंट कायदा लागू केल्याने बी-बियांणाबाबत बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व वाढले. खुल्या आयात धोरणामुळे सधन देशातला शेतीमाल भारतात आल्याने देशी मालाला किंमत मिळाली नाही त्यामुळे खर्च अधिक व उत्पन्न कमी अशा कचाट्यात शेतकरी सापडला व आत्महत्या करू लागला. सधन देशांनी शेतमाल निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सबसिडी दिली आहे. ती त्यांना 2005 पर्यंत कमी करायची होती. परंतु त्यांनी हा कालावधी हॉंगकॉंग परिषदेत 2013 पर्यंत वाढवून घेतला आहे. तोपर्यंत भारतीय शेतकरी काठाला लागतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे.
विकसनशील देश आपल्या उत्पादन मूल्याच्या 10% आर्थिक अनुदान देऊ शकतो. परंतु विकसित देशासाठी ही मर्यादा 5%. आहे .



विकसित देशासाठी ही मर्यादा 5%. आहे . उल्लेखनिय हे आहे की, भारतात कृषी सबसिडीचा स्तर WTO ने निर्धारित केल्यापेक्षा कमी आहे.टीकाकारांचे असे मत आहे की, WTO ने सिद्धांतरूपाने विकसनशील देशाचा पक्ष घेतला आहे. परंतु व्यवहारात कार्य करताना विकसनशील देशाच्या कृषीवर वाईट परिणाम झाला आहे

विकसित देश Green Box व Blue Box अनुदानांतर्गत कृषीला मदत देतच राहिले विकसित देशाद्वारे कृषी निर्यातीसाठी मोठ्या प्रमाणात सबसिडी दिल्याने आंतरराष्ट्रीय कृषी किमती भारतीय कृषी किमतीपेक्षा कमी झाल्या. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे भरमसाठ नुकसान होत आहे आणि देशातील काही राज्यात घडणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या याला WTO चे धोरण जबाबदार आहे असे काही तज्ज्ञ मानतात.

### 2) बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी :-

WTO च्या धोरणानुसार भारतात करार शेतीस प्रोत्साहन दिले जात आहे.त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हाती मोठ्या प्रमाणात जमिनी जाऊन त्यांची मक्तेदारी वाढेल ह्या कंपन्या नफ्याच्या मागे असल्याने विकास, कल्याण व पर्यावरण यांचे त्यांना काही घेणे देणे असणार नाही. नफ्यासाठी ते रासायनिक खत, किटकनाशक व यंत्र यांचा वापर वाढवतील यासाठी जैविक कृषीची सुरुवात करणे भारतीयांपुढे मोठे आव्हान आहे.

### 3) लहरी मान्सून :-

अजुनही भारतीय शेती मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे उत्पादनाच्या बाबतीत अनिश्चितता आढळून येते. निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे उत्पादनावर विपरीत परिणाम होतो म्हणून देशातील मान्सून शेती कशी कमी करता येईल हा शेती पुढील एक आव्हानात्मक प्रश्न आहे.

### 4) शेतकऱ्यांच्या आत्महत्या:-

पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शेतीला भरपूर उत्पन्न घेण्यासाठी मुलभूत अडचणी म्हणजे कायमस्वरूपी पाणी नसणे पाण्याविना उत्पन्नात वाढ नाही. शासकीय सोसायटी , पतसंस्था, बँका व त्यातच खाजगी सावकाराने दामदुप्पटीने दिलेले पैसे घेऊन उत्पन्न वाढीच्या आशेवर लोळणारा भारतीय शेतकरी पाहिजे तेवढे उत्पन्न घेऊ शकला नाही. मात्र तो कर्जाच्या खाईत बुडला गेला.

#### शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे

जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून भारतीय शेतकऱ्यांची अवस्था नाजूक व बिकट म्हणून आत्महत्या करण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे. शेतकाऱ्यांचे कर्जबाजीरी प्रमाण वाढल्यामुळे आत्महत्या होत आहेत. भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होत असल्या तरी अर्थव्यवस्थेला अशोभनीय प्रसंग आहे. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणमीमांसा व अंदाज करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांनी सर्वेक्षण केले आहे. तसेच सकाळ वृत्तसमुहाने यवतमाळ 80 , अमरावती 40 अशा एकूण 120 गावातील आत्महत्याचा शोध घेतला. तसेच विधानसभा, लोकसभा या सभागृहात या समस्याचे गांभीर्याने विचारमंथन झालेले आहे.

**कर्ज विनियोगामुळे आत्महत्या**

| तपशील | टक्केवारी |
|---|---|
| शेतीसाठी | 41% |
| लग्नासाठी | 19% |
| शिक्षण | 18% |
| घरबांधणी | 6% |
| एकूण | 100% |

**स्त्रोत :- योजना मासिक, फेब्रुवारी 2010 , पृष्ठ क्र. 52**

वरील सारणीवरून असे दिसून येते की अनुत्पादक कारणामुळे (शिक्षण, लग्नासाठी) 37% शेतकऱ्याने आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या शेतीसमोरील ज्वलंत प्रश्न असून या आत्महत्या नापीक, परिस्थिती, कर्ज , थकबाकी , खाजगी सावकारी, जाच, कर्जाचा विनियोग, विपर्यास्त, वाढता शेती उत्पादन खर्च आणि बिनकिफायतशीर शेतमाल किमती, दुष्काळ अशा विविध कारणांनी शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

### 5) दर हेक्टरी उत्पादकता :-

सन 1950-51 नंतर भारतीय शेतीची प्रमुख पिकांची दर हेक्टरी उत्पादकता वाढलेली असली तरी लोकसंख्येच्या मानाने उत्पादकता कमी असून अन्नधान्याची टंचाई निर्माण झालेली आहे. अंतर्गत अर्थव्यवस्थेत अन्नधान्य टंचाईमुळे उपासमारीचे संकट निर्माण झाले होते. शेतीचे पावसावरील अवलंबित्व व परंपरागत शेती प्रकार यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे.

### 6) शेत जमिनीचे आकारमान :-

भारतीय शेत जमिनीचे वंशपरंपरा, कर्ज बाजारीपणा, दुष्काळ, एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, या कारणामुळे सतत लहान व छोटे छोटे तुकडे यामुळे शेतीत यांत्रिकीकरणाला मर्यादा पडतात. त्यामुळे शेतीचे आर्थिक नुकसान होते. शेतजमीनीचे आकारमान लहान प्रमाणात आहे. शिवाय सीमांत व लहान आकाराचे धारण क्षेत्र जास्त आहे आणि मोठे आकाराचे कमी आहे. परिणामतः शेतजमिनी बांध- बंदिस्त, पाट , रस्ते या स्वरूपात वाया जाते. तसेच यांत्रिकीकरणावर मर्यादा पडतात. परिणामी शेती बिन किफायतशीर बनते.

### 7) माती परीक्षण :-

शेतकरी बहुपिक पद्धतीचा अवलंब करून जास्तीत जास्त उत्पादन काढीत आहे. त्यामुळे जमिनीतून भरपूर प्रमाणात अन्न द्रव्याचे शोषण होते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी कमी होत आहे. तसेच उत्पादकता घटत जाऊन शेती करणे परवडत नाही. यासाठी अधिक उत्पादनाबरोबरच जमिनीची सुपिकता टिकविणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता जमिनीत पीक घेण्याअगोदर जमिनीतील माती परीक्षण करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

### 8) पाणी परीक्षण :-

शेतकरी शेतीत रासायनिक खते अधिक धान्य उत्पादनासाठी वापरतो तीही एक प्रकारची क्षारच आहेत. असे क्षार पाण्याच्या निचऱ्याने विहिरीत किंवा नाल्यात येऊ शकतात. तसेच कारखाने ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी कारखान्यांनी सोडलेल्या क्षारयुक्त आणि इतर हानीकारक द्रव्ये असणारे पाणी विहिरीत , नाल्यात येते आणि ते ओलितासाठी अयोग्य ठरते. तेव्हा ओलितासाठी वापरावयाचे पाणी तपासणे महत्त्वाचे ठरते.

### 9) पाणी , वीज व हवामानातील बदल:-

अल्पभूधारकांची वाढती संख्या , वीज, पाणी तसेच अलिकडील काळातील हवामानातील बदल या कृषी क्षेत्रास भेडसावणाऱ्या ज्या मोठ्या समस्या आहेत. हवामान बदलामुळे वेळी अवेळी पडणाऱ्या पावसामुळे अचानक उद्भवणाऱ्या कीड व रोगांच्या प्रादुर्भावात वाढ होऊन पीक उत्पादनावर अनिष्ट परिणाम होत आहे. तसेच वेळी अवेळी पडणाऱ्या अति किंवा कमी पावसामुळे उत्पादनात घट होत आहे.

वाजवीपेक्षा अधिक उपशामुळे देशाच्या व राज्याच्या अनेक भागात भूगर्भातील पाण्याची पातळी घटू लागली आहे. वेगाने होत असलेली आर्थिक प्रगती आणि वाढत्या शहरीकरणामुळे पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. हवामानातील बदलामुळे ही परिस्थिती पुढील काळात अधिकच गंभीर बनण्याची शक्यता आहे.

### 10) सार्वजनिक वितरण प्रणाली (Public Distributions System: PDS )

भारताच्या उपभोक्त्याना स्वस्त व अनुदानित दराने आवश्यक उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक वितरण प्रणाली राबविण्यासाठी सरकार उत्पादकाकडून व व्यापाऱ्याकडून अधिप्राप्ती किंमतीने जीवनावश्यक वस्तू किंवा धान्य स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून उपभोक्त्यांना पुरविल्या जातात. तसेच धान्याचे शिलकी साठेही निर्माण केले जातात. धान्य , खाद्यतेल, साखर, केरोसीन , कपडे इत्यादी वितरणासाठी ही प्रणाली वापरली जाते. PDS वर सरकारला करावा लागणारा खर्च हे एक प्रकारचे अर्थसहाय्य आहे. सुरुवातीच्या काळात सरकारचे धोरण ग्राहकांच्या हिताच्या बाजूने झुकलेले होते. परंतु नंतर अमेरिकेकडून सवलतीच्या अटीवर गहू आयात करुन तो भारतात PDS मार्फत पुरविल्याने गव्हाची बाजारातील किंमत कमी राहिली आणि उत्पादनाला प्रोत्साहन कमी झाल्याने शेतकरी व शेतीवर संकट आले.

### 11) गोदाम सुविधा :-

गोदामाच्या पुरेशा सोयी नसल्यामुळे शेतमालाची त्वरीत विक्री करावी लागते. त्यामुळे कमी किंमत मिळून शेतकऱ्यांचे नुकसान होते. गोदामाच्या कमतरतेमुळे दरवर्षी 10 ते 20 % धान्य उंदिर व किटक खाऊन फस्त करतात.

### 12) शेतमालाच्या किंमतीत अस्थिरता :-

शेती उत्पादन बव्हंशी निसर्गावर अवलंबून असते. निसर्गाने साथ दिली तर शेती उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढते शेतीमालाचा पुरवठा वाढून त्याच्या किमती घटतात तसेच काही वेळा निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतमालाचे उत्पादन कमी निघते. शेतमालाचा पुरवठा घटून त्याच्या किंमती वाढतात. अशाप्रकारे शेतमालाच्या उत्पादनात अनिश्चितता असल्याने त्यांच्या किंमतीत नेहमी चढउतार होतात.

उत्पादनाच्या चार घटकांमध्ये भूमी, श्रम, भांडवल आणि संघटन या चार घटकांचा समावेश होतो. शेतकरी हा उत्पादनाच्या प्रक्रियेत संघटक असतो. परंतु त्यांचे किमतीवर नियंत्रण नसते. अर्थव्यवस्थेत ग्राहकांच्या आवडीनिवडी , हवामान या बाबी शेतमाल उत्पादनाच्या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. औद्योगिक वस्तूच्या किमती निश्चित असतात. या किमती उत्पादक ठरवित असतो. भारतात शेतमालाचे उत्पादन करणारा शेतकरी हा संयोजक/संघटक असतो परंतु उत्पादित मालाच्या किमती ठरविण्याचा त्यास अधिकार नाही. शेतमालाच्या किमतीवर प्रभाव टाकणारे अनेक घटक आहेत. शेती उत्पादित वस्तूंची किंमत अनिश्चित असल्याने शेती उत्पादनात अनिश्चितता आढळून येते.

### 13) किटकनाशके चाचणी :-

दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येचा विचार करता लोकसंख्येनुसार अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे आवश्यक झालेले आहे. रोगांना आणि किडींना बळी पडून बऱ्याच प्रमाणात पीक उत्पादनात नेहमी घट होत असते. त्याच प्रमाणात पीक साठवणुकीत सुद्धा किडीच्या प्रार्दुभावामुळे हाती आलेल्या पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागते.

### कृषी संकट निर्मूलनासाठी सरकारच्या योजना :

भारतीय कृषी निसर्गावर अवलंबून असल्याने अनेक संकटाचा सामना करावा लागतो. यासाठी कार्यक्षम व प्रभावी उपाययोजनाची गरज आहे. सरकारकडून केल्या जाणाऱ्या विविध प्रयत्नातून कृषी संकट कमी करण्यास मदत होईल. त्यासाठी काही योजना राबविणे गरजेचे आहे.

### 1)भारतातील पीक विमा योजना :-

नैसर्गिक आपत्तीपासून पिकांचे संरक्षण व्हावे म्हणून पीक विमा योजना 1999 ला सुरू करण्यात आली आहे. भारतीय शेती मान्सूनवर अवलंबून आहे.शेतकऱ्यांच्या उत्पादनात नियमित वाढ व्हावी आणि शेतकऱ्यांचे मनोबल टिकून रहावे म्हणून पीक विमा योजना लागू करण्यात आली. पीकविमा योजनेमुळे आग, नैसर्गिक संकटे, अवर्षण , अतिवृष्टी ,दुष्काळ, गारपीट, रोगराई इत्यादी कारणामुळे पिकांना होणारी हानी भरून काढणे व शेतकऱ्यांना संरक्षण देणे या दृष्टीने पैशाच्या स्वरूपात आणि धान्याच्या स्वरूपात नुकसान भरपाई देण्यासाठी ही सरकारने पीक विमा योजना सुरू केली आहे.

### 2) राष्ट्रीय कृषी विकास योजना:-

राष्ट्रीय कृषी विकास योजना ऑगस्ट 2007 मध्ये सुरू झाली आहे. राज्यसरकारच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची आहे. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढीसाठी मदत होते. केंद्रसरकारच्या 11 व्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग आहे. तांदूळ, गहू, डाळीच्या संशोधनासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेत तरतूद करण्यात आली आहे.

### 3) किसान क्रेडीट कार्ड योजना :-

1998-99 ला सुरु करण्यात आलेली किसान क्रेडीट कार्ड योजना शेतकऱ्यांना अल्पावधी कर्ज सुविधाजनक बनवून अभिनव परिवर्तन आणणारी कार्यपध्दती आहे. किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वाटप केले जाते.

### 4) ग्रामीण भंडारन योजना :-

शेतकऱ्यांची प्रतिक्षा क्षमता कमी असल्याने ते मालाची विक्री त्वरीत करतात. यासाठी सरकारने शेतमाल साठवणुकीच्या सुविधा उपलब्ध केल्या. मध्यवर्ती गोदाम महामंडळ, राज्य गोदाम महामंडळ, भारतीय अन्न महामंडळ इत्यादी माध्यमातून गोदामाच्या सोयी उपलब्ध करण्यात आल्या याशिवाय नाशवंत मालाच्या साठवणुकीसाठी शीतगृहाची (Cold Storage) सोय करण्यात आली आहे. याशिवाय गोदामात ठेवलेल्या मालाच्या पावतीच्या तारणावर बँकांकडून कर्जेही मिळू शकतात. यामुळे **एकंदरीत शेतकऱ्याची प्रतिक्षा क्षमता वाढली.**

### 5) शेतीविषयक संशोधन :-

योजना काळात शेती कार्यक्रमांतर्गत शेती संशोधनास विशेष महत्त्व देण्यात आले आहे. हे कार्य (Indian Council of Agricultural Research) भारतीय शेती संशोधन परिषद, राज्य कृषी संशोधन संस्था व अन्य संस्थांवर सोपविण्यात आले आहेत. देशात शेतकी विद्यापीठांची स्थापना केली आहे. या विद्यापीठात शेतीविषयक शिक्षण देण्यात येते व शेतीबाबत संशोधन कार्य केले जाते.

### 6) बी-बीयाणे :-

गेल्या 25 वर्षात विशेषतः नियोजनाच्या प्रारंभापासून बी-बियाण्यांचा प्रश्न सोडविण्याचा जिकरीने प्रयत्न सुरू आहे. शेती आयोगाच्या शिफारशीनुसार अनेक क्षेत्रांत उत्तम बियाण्यांची पैदास करण्याचे प्रयोग हाती घेण्यात आले आहेत. भारतीय शेती संशोधन परिषद (Indian Council of Agricultural Research) राज्य सरकार, राज्य कृषी संशोधन केंद्रे, कृषी विद्यापीठ व इतर संस्था बी-बीयाणांची पैदास करून शेतकाऱ्यांत प्रचार व प्रसार करणे. उत्तम बियाण्यांचे प्रकार शोधून काढणे. जंतुनाशक द्रव्यांचा शोध, लागवडीच्या नवीन पद्धती, अधिक उत्पादन देणारे बी यांचा शोध लावण्यात या शेतकी विद्यापीठांना यश आले आहे.

### 7) प्रशिक्षण आणि भेट योजना :-

शेतकाऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी म्हणून प्रशिक्षण आणि भेटयोजना शासनाने सुरू केली आहे.

### 8) कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा विस्तार :-

कृषीमालाला वाजवी किंमत प्राप्त व्हावी म्हणून सहकारी कृषी उत्त्पन्न बाजार समित्यांचा विस्तार करण्यात आला आहे.

### 9) शेतीसाठी कर्जपुरवठा :-

शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी राष्ट्रीयकृत, व्यापारी बँका, सहकारी बँकानी वेगवेगळया योजना हाती घेतल्या आहेत. **शेतकाऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड** योजना सुरू करण्यात आली आहे.

### 10) कर्जमाफी:-

तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी 29 फेब्रवारी 2008 रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात देशातील शेतकऱ्यांसाठी सुमारे 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीची घोषणा केली. नापिकी, दुष्काळ , घटते उत्पादन या समस्यांनी त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना या ऐतिहासिक निर्णयाने मोठा दिलासा मिळाला. केद्रशासनाने कर्जमाफीचे वचन दिल्यानंतर राज्यशासनाने कर्जमाफी जाहीर करून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे दाखवून दिले.

### 11) दुष्काळ परिस्थितीवर उपाय :-

पावसाच्या अनिश्चित प्रमाणामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. दुष्काळग्रस्त भागात लोकांना मदत करावी लागते. तेथे चारा, अन्नधान्य, पिण्याचे पाणी यासारखे प्रश्न निर्माण होतात. दुष्काळग्रस्त भागाचा कायमस्वरूपी विकास करण्यासाठी पाणीपुरवठ्याच्या स्त्रोताचा विकास केल्यास दुष्काळापासून कायम सुटका करून घेता येते.

दुष्काळ भागात रोजगार हमी योजना, उपजीविकेचे साधने उपलब्ध करून देणे. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या कल्याणाकडे सरकारने विशेष लक्ष दिले पाहिजे त्यासाठी आर्थिक तरतूद केली पाहिजे.

### 12) हरितक्रांतीला प्रोत्साहन

दुसऱ्या हरित क्रांतीसाठी बहूपीक पद्धती लघुसिंचनावर भर, जैविक खताचा वापर, कोरडवाहू शेतीचा विकास आणि लहान शेतकऱ्यांचा फायदा व्हावा हीच अपेक्षा आहे. अकारण भारतात वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नधान्याची उपलब्धता तेवढयाच प्रमाणात असायला पाहिजे. सन 2050 सालापर्यंत भारताच्या 150 अब्ज लोकसंख्येसाठी सुमारे 450 दशलक्ष टन इतक्या अन्नधान्याची गरज भासेल. राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम व डॉ प्रतिभा पाटील यांनीही देशाला दुसऱ्या हरितक्रांतीची गरज व्यक्त केली. तसेच डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली आराखडा देखील तयार करण्यात आला आहे.

भारतात संकरित बीयाणांच्या क्षेत्रात योग्य वाढ झालेली नाही तेंव्हा या वाढीसाठी फार मोठी संधी आपल्यापुढे उभी आहे. **ब्रिटनचे वेडिंग्टन यांनी दुसऱ्या हरितक्रांतीसाठी संकर हाच पुन्हा एकदा केंद्रस्थानी राहिल** असा अंदाज व्यक्त केला

### निष्कर्ष (Conclusion) :-

1) आजदेखील 60% शेती मान्सूनवर अवलंबून आहे.
2) सुधारणानंतरच्या काळात शेतीक्षेत्रात देशाच्या एकूण देशांतर्गत उत्पादनातील वाटा घटला.
3) सरकारने कृषी वस्तूच्या निर्यातीसाठी आवश्यक ते कर्ज उपलब्ध करून दिले.
4) सरकारने कृषी वस्तूच्या निर्यातवाढीसाठी काही संस्थाची स्थापना केली. उदा. 'Indian Trade Promotion'.

### समारोप :-

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर **'नाबार्ड' च्या सहाय्याने शेतकऱ्यांस 4%** इतक्या अल्प व्याजदराने कर्ज देणाऱ्या पतपुरवठा संस्थांची गरज आहे. **'किसान क्रेडीट कार्ड' ,'पीक विमा योजना'** यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे याच बरोबर जीवनाश्यक वस्तू कायदा, 'कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा', किमान आधारभूत किंमत यामध्ये ठोस बदल करणे गरजेचे बनले आहे. **थोडक्यात** दुसऱ्या हरितक्रांतीच्या आगमनाने तसेच सरकारच्या विविध योजनाद्वारे कृषी संकटावर मात करून आर्थिक विकासाकडे वाटचाल करता येईल हे सत्य नाकारता येणार नाही.

### संदर्भ ग्रंथसूची :-

1. भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगिता साहित्य सीरीज , 2011.
2. प्रा. रायखेलाकर.ए.आर /डॉ. दामजी, बी.एच, 'भारतीय अर्थव्यवस्था, ' विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, ( जानेवारी 2013).
3. डॉ. गंगाधर वि. कायंदे-पाटील, 'शेतीचे अर्थशास्त्र' चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक-13, ( सप्टेंबर-2008)
4. डॉ. विजय कविमंडन, 'कृषी अर्थशास्त्र', मंगेश प्रकाशन, नागपूर
5. डॉ. टकले. एस. आर / डॉ. पोवळे. टी. व्ही , 'कृषी अर्थशास्त्र', सिरीयल प्रकाशन, दिल्ली.
6. मासिक, 'स्कॉलर ॲकॅडमी पब्लिकेशन', पुणे. (पृष्ठ क्र. -37-38)
7. योजना, जानेवारी -2010 (पृष्ठ क्र. 31-32)
8. योजना, फेब्रुवारी -2010, (पृष्ठ क्र. 48-52)
9. योजना, जानेवारी -2011 (पृष्ठ क्र. 53-57)
10. कर्जमाफी विशेषांक, 'लोकराज्य', जानेवारी 2009 (पृष्ठ क्र. 10-11)
11. समृध्द शेती: दौलत महाराष्ट्राची, 'लोकराज्य', जून-2012, ( पृष्ठ क्र. 07,08,12,13,34)
12. Rudra Dutta, K.P.M. Sundaram : "Indian Economy" S. Chand & Sons, New Delhi : edi-2010
13. I.C. Dhingra, V.K. Garg, "Micro Economics & Indian Economic Environment," S.chand & Sons, Publications, New Delhi: edi-2005
14. www. Agrarian Crisis in india
15. www. 'Agri related Scheme of India'
16. www. google Rashtriya Gramin Yojana'
17. www.google. Central gov.Agricultural Schemes



**प्रा.डॉ.डी.जी.पाटील**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख , जी.टी.पाटील महाविद्यालय, नंदुरबार.**